# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)

Ganeshkhind, Pune – 411007

दुरध्वनी क्र.: ०२०-२५६२११८८/८९/९०

Telephone : 020-25621188/89/90

इ-मेल/Email: - affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

Academic Section (Affiliation Unit)

संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/ 855

दिनांक : 24/5/24

**कालमर्यादेचे व महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र**

**विषयः— अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र** इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या मान्यतेकामी स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) द्वारे माहिती सादर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या मान्यतेकामी माहिती स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) द्वारे ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करावयाची आहे.

उपरोक्त अहवाल हा संबंधित संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या/परिसंस्थेच्या PUNCODE वर उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंकवर काळजीपूर्वक भरून तसेच सदरहू अहवालातील मुद्दयांमध्ये नमूद केलेली आवश्यक ती कागदपत्रे संबंधित ठिकाणी Upload करून **शुक्रवार, दि. ३१ मे, २०२४ रोजी सायंकाळी ६.००** वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच SAR ची एक प्रत विद्यापीठ कार्यालयात त्वरीत सादर करावी.

स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) सोबत राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांचे मान्यतेचे पत्र (Recognition Order), बार कौन्सिल ऑफ इंडिया (बी.सी.आय.) यांचे मागील वर्षाचे (शै.व. २०२३—२४) अभ्यासक्रम मान्यतेचे आदेश, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांचे

मान्यतेचे आदेश (EOA) इ. तसेच संबंधित शिखर परिषदांच्या अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता मान्यतेची एक प्रत विद्यापीठ कार्यालयात त्वरीत सादर करावी. त्याचप्रमाणे अधिस्वीकृती अभिकरणाच्या मानकांनुसार अधिस्वीकृती किंवा पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र महाविद्यालय/परिसंस्थांनी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून (NAAC) /राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (NBA) अधिस्वीकृती किंवा पुनर्रअधिस्वीकृती केल्याचे प्रमाणपत्रही सादर करावे.

शिखर परिषदांच्या अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता मान्यतेनुसार तसेच अहवाल व कागदपत्रांनुसार उक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयाच्या/परिसंस्थाच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या मान्यतेकामीची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाकडून घेण्यात येणारा निर्णय हा संबंधित महाविद्यालयावर/परिसंस्थेवर बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) भरण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही. जी महाविद्यालये/परिसंस्था विहीत मुदतीत स्वयं मूल्यमापन अहवाल (SAR) भरणार नाहीत त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांचे प्राचार्य/संचालक यांची राहील. त्याचप्रमाणे स्वयं मूल्यमापन अहवालामधील माहिती भरून झाल्यानंतर अहवालामध्ये सुधारणा करण्यासाठी लिंक उपलब्ध होणार नाही याची नोंद घ्यावी. सबब संबंधित माहिती महाविद्यालय/परिसंस्थांनी काळजीपूर्वक भरावी.

कळावे,

आपला,

(गिरीश पु. बेंद्रे)

उपकुलसचिव, संलग्नता कक्ष